महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ (२२६७ 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ( 2267 0210/148/248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ (२३७४२१९१ फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 (23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**सहायक (पूर्व) परीक्षा -२०१२ क्रमांक १४४२(३)(१)/२०१२/तीन**

**जाहिरात क्रमांक : २३७/२०१२**

आयोगातर्फे सहायक (पूर्व) परीक्षा-२०१२ ही **रविवार, दिनांक २४ जून, २०१२** रोजी महाराष्ट्रातील विविध **३५ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या** :-

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | वि. मा प्र. | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | इ. मा. व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** |
| **१** | **सहायक (एकूण ९४ पदे)** | ५७ | ८ | ८ | -- | -- | -- | १ | ३ | १७ |
| | महिला - | १७ | २ | २ | -- | -- | -- | -- | १ | ५ |
| | खेळाडू - | ३ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | अपंग - | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू- २, श्रवण शक्तीतील दोष- १ अंधत्व किंवा क्षीणदष्टी – १ | | | | | | | | |

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.**३** महिलांसाठी असलेले आरक्षण शासननिर्णय महिला बालविकास व विभाग क्र. ८२/२००१/म.से.आ २०००/प्र. क्र. ४१५/का-२ दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.४ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.५ अपंग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.६ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि, त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे**.

**३. वेतनश्रेणी** :- रूपये ९,३००-३४,८००, (ग्रेड पे रुपये ४,३००) अधिक नियमानुसार भत्ते.

**४. पात्रता** :-

४.१. भारतीय नागरिकत्व

४.२ वयोमर्यादा :- दिनांक १ ऑगस्ट, २०१२ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम **:-**

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.२ अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

४.३.३ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.४ सहायक हे पद अराजपत्रित गट-ब संवर्गातील असल्यामुळे सदर पदांसाठी माजी सैनिकांसाठी आरक्षण विहित केलेले नाही . माजी सैनिकांच्या आरक्षणासंदर्भात मा.उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे.

४.३.५ माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

**४.४** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.५ शैक्षणिक अर्हता** :-

४.५.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.५.२ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु सहायक (मुख्य) परीक्षा- २०१२ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी सहायक (मुख्य) परीक्षा २०१२ करिता विहित माहिती स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४.५.३ अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल, अशा पदवीधारकाने सदर अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केलेली असली पाहिजे.

४.५.४ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

४.५.५ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील "**सहायक परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. प्रस्तुत पदांना शासनाने दि. ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू आहे.

**७. शुल्क** : **७.१** अमागास - २६०/- ७.२ मागासवर्गीय - १३५/-

**८. अर्ज करण्याची पद्धत** :-

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १८ एप्रिल, २०१२ ते ८ मे, २०१२** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे
(२) क्रेडिट कार्ड
(३) डेबिट कार्ड
(४) नेटबँकिंग
(५) कॅश कार्ड

८.६ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त् होईल.

८.७ विहित पद्धतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.८ दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

८.९ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.१० परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**९**. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक ८ मे, २०१२** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१०.**चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ९ मे, २०१२** पर्यंत बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

**११**. सहायक (पूर्व) तसेच (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १८ एप्रिल, २०१२.

दी. प्र. मिरजकर
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.